
|| सबका मालिक आत्मा ||

# आत्मा मालिक चैत्र महोत्सवाच्या सर्व भाविकांना हार्दिक शुभेच्छा!



## आत्मा (SOUL)

|| हृदयामध्ये आत्म्यावरती प्रेम करण्याची कला म्हणजे ध्यान ||

आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

||ॐ गुरुदेव||

आत्मा मालिक

एप्रिल-२०२५

## ।। सबका मालिक आत्मा ।।



# ।। अमृतवाणी ।।

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व–रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

## ।। आत्मा मालिक ।।

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

**मासिक ॐ गुरुदेव**

वर्ष २४ वे अंक ०४ था एप्रिल २०२५ ● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**आत्मा मालिक ध्यानपीठ**

दीपक टिळेकर, मो. ८३८००३९३०५
सुखदेव मोरे, मो. ७०५८०५९६६१

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**

कुमार पाटील, मो. ९९२२२२८६५५
विलास गायकवाड, मो. ९९२२१७४२११

संपादकीय - आनंदघन चैत्रमहोत्सव - संत परमानंद महाराज ४

सगुण : संकल्पना व उपासना (भाग १) -डॉ. विजय बाणकर ६

ज्ञानेश्वरीचे सहज स्मरण : भाग २ - नामदेव सदावर्ते ११

निरुपण -बंडोपंत कुलकर्णी १६

'ज्ञानेश्वरी'तील आत्मादर्शक सौंदर्यस्थळे- भाग : ३ - डॉ. सुनील शिंदे १९

चैत्र गुढीपाडवा व श्रीराम नवमी जन्मोत्सव -बी. के. गायकवाड २२

पुरुषार्थ - नरेश यादव २५

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## आनंदघन चैत्रमहोत्सव

**संपादकीय**

ईश्वरीय अभिव्यक्तीतूनच आत्मतत्वाची प्राप्ती होते. 'ज्ञानियांचे ज्ञेय, ध्यानियांचे ध्येय' प. पू. आत्मा माऊलींच्या सानिध्यात ध्यानाच्या माध्यमातून प्रत्येक आत्म्याला अशीच परमात्म्याची ओळख पटते आणि आयुष्याच्या मैफलीचा महोत्सव होतो. प्रत्येक श्वासाला हृदयस्थ आत्मतत्वाच्या सुगंधाचा प्रत्यय येतो व आयुष्याच्या बासरीतील षडरिपूंच्या छिद्रांतून सुरेल 'आत्मधून' प्रकट होते. यंदाही सद्गुरूंनी ८ ते १२ एप्रिलदरम्यान आनंदघन चैत्रमहोत्सव आयोजित केला आहे. या दुर्लभ क्षणांचे साक्षीदार होण्याचा बहुमान आपणा सर्व भाविक-भक्तांना मिळणार आहे. या महोत्सवासाठी आपण सर्व सादर आमंत्रित आहात.

-संत परमानंद महाराज

**या** जगाच्या दैनंदिन रहाटामध्ये आज माणूस अतिशय हतबल होऊन मेटाकुटीला आला आहे. जीवन रुक्ष झाले आहे. जीवनातला भाव नष्ट होऊन भावाची जागा अभावाने घेतली आहे. विभिन्न साथी, आजारपणे यामुळे त्याचे शरीर, मन जर्जर होत आहे. जीवनवेदीवरील अनेक प्रसंग नित्य तेजोभंग करणारे असतानाच प. पू. आत्मा मालिक माऊलींनी संपूर्ण विश्वाला ध्यानाचा मार्ग प्रशस्त करून दिला आणि या वठलेल्या मानवरुपी झाडाला पुन्हा नव्याने चैत्रपालवी फुटली. सृष्टीच्या पानगळीनंतर निष्पर्ण झालेल्या झाडाला पुन्हा-पुन्हा नव्याने चैत्र पालवीचा, बहरण्याचा संधीयोग चैत्रातून निर्माण करणारा निसर्ग! जीवनात विघटन झालेल्या माणसांचे पुन्हा-पुन्हा ध्यानाच्या माध्यमातून संघटन करण्याचा संधीयोग निर्माण करणारे प. पू. गुरुदेव ही निर्माणाचीच अधिष्ठानभूत शक्ती आहे!
प. पू. आत्मा मालिक माऊलींच्या सानिध्यात ध्यानाच्या माध्यमातून प्रत्येक आत्म्याला परमात्म्याची ओळख पटते आणि आयुष्याच्या मैफलीचा महोत्सव होतो. प्रत्येक श्वासाला हृदयस्थ आत्मतत्वाच्या सुगंधाचा प्रत्यय येतो व आयुष्याच्या बासरीतील षडरिपूंच्या छिद्रातून सुरेल 'आत्मधून' प्रकट होते. चैत्र पौर्णिमा महोत्सवानिमित्ताने या दुर्लभ क्षणांचा साक्षीदार होण्याचा बहुमान आपणा सर्वांना मिळणार आहे.

प. पू. गुरूदेव सांगतात कुठल्याही माणसाची आत्मिक प्रगती त्या माणसाच्या ध्यान आणि ध्यानातून स्फुरलेल्या विचारशक्तीतून घडत असते. अखेर ध्यानातून स्फुरलेले विचारच माणसाला आत्मप्रवृत्त करतात. तिथंच घडतो. चिरतरुण ध्यानाचा महोत्सव अर्थात ध्यानोत्सव. ध्यान म्हणजे एका आत्म्याची दुसऱ्या आत्म्याशी भेट! ध्यानस्थ जीवन हे नेहमी रचनात्मक (ईश्वरीय) शक्तीच्या जास्त निकट असते. त्यामुळे क्रिया प्रतिक्रियेच्या नियमावर आधारित परस्पर देवाणघेवाणीच्या नियमानुसार त्याकडे अगणित ईश्वरीय कृपाप्रसादाचा ओघ वाहू लागतो. अंतः आत्मद्वैत संपूर्ण अद्वैत निर्माण होते. अर्थात् परमआत्म्याची प्राप्ती. मनुष्य स्वभावतः:च ध्यानी आहे. मात्र, त्याच्या देहबुद्धीला कधी-कधी ध्यानाचा विसर पडतो. त्यामुळेच स्वतःला अस्वस्थ करणारे असमाधान त्याला सतत जाणवत असते. देहबुद्धीच्या साच्यात त्याला अवघडल्यासारखेही होत राहते. म्हणूनच यावर उपाय म्हणून तो कधीतरी अंतर्मुख होण्याचा प्रयत्न करतो. मात्र, येथेच त्याच्या जीवनाला वळण मिळते. या वळणावर जर इष्ट

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

वाटाड्या भेटला नाही, तर भटकंती होते व सद्‌गुरूसारखे मार्गदर्शक भेटले तर जीवन ध्यानी होऊन आत्मज्ञान जागृत होते आणि हिच जीवनाची खरी

फलश्रुती असते. खऱ्या अर्थाने देह जाणिवेची बैठक जेव्हा आत्मिक भावनेइतकी उत्कट होते आणि जेव्हा ती नखशिखांत ध्यानात न्हावून शूचिर्भूत बनते. तेव्हाच खऱ्या स्व-रुपाची प्राप्ती होऊन ब्रह्मानंदाचा लाभ होतो. खरंतर माणसाला त्याच्या अव्यक्त आत्मसामर्थ्याची बऱ्याचदा जाणीव नसते. जेव्हा एखाद्या अचेतन लोखंडाच्या तुकड्यात चुंबकीय गुण निर्माण केले जातात तेव्हा तो तुकडा त्याच्या वजनाच्या १२ पट वजन उचलू शकतो. पण त्याचे चुंबकीय गुण काढून घेतले तर तो आता साधा कागदाचा तुकडाही उचलू शकत नाही. अचेतन लोखंडाच्या तुकड्यात जर चुंबकीय शक्तीचा हा प्रभाव पडत असेल तर चेतन मनुष्यात ध्यानाच्या अमोघ शक्तीने असे आत्मसामर्थ्य निर्माण होते की जगातील कुठलाही मापदंड त्याला प्रमाणित करू शकत नाही. म्हणूनच असे आत्मसामर्थ्य प्रत्येक साधकांमध्ये निर्माण व्हावे हीच गुरुदेवांची सदोदित इच्छा असते व त्यासाठी प. पू. गुरुदेवांचा प्रत्येक श्वास कार्य करत असतो. याचाच एक भाग म्हणून पुण्यनगरी कोकमठाण आश्रमात चैत्र महोत्सवाचे आयोजन नियमितपणे करण्यात येत आहे. आत्मोत्सवी जीवांना चैत्र महोत्सव खरंतर एक पर्वणीच असते. कारण या काळात अनेक दिवसांपासून तप, साधना, व्रत केलेल्या जीवांना साक्षात गुरुदेवांच्या सानिध्यात, सहवासात आपल्या व्रताची सफल सांगता करण्याचा योग मिळणार असतो. म्हणूनच एखाद्या चातक पक्ष्याप्रमाणे सर्व साधकांचे लक्ष आता केवळ आणि केवळ चैत्रमहोत्सवाकडेच लागून आहे. आता ही वेळ अतिशय जवळ येऊन ठेपली याचे आत्मिक समाधान आहे व स्व-जीवनाचा महोत्सव करण्याची तयारीही आहे! नेहमीच सर्जन व विसर्जन या दोहांच्या सहयोगाने जीवनाची सजावट सुंदर वाटते चांगल्या ईशमान्य गोष्टींचे सर्जन व दुर्गुणांचे विसर्जन करून आत्मतत्वाच्या प्राप्तीसाठी, येणारा चैत्र पौर्णिमा महोत्सव आपण साजरा करूया. प. पू. गुरुदेवांनी सांगितलेल्या ध्यानमार्गाचा अवलंब करून हजारो लाखो साधकांनी जसा स्वजीवनाचा महोत्सव करून घेतला आहे. तसाच या आत्मोत्सवाचा लाभ प्रत्येक साधकाला मिळावा म्हणूनच निसर्गाने सृजनशीलता बहाल केलेल्या चैत्र महिन्याचे औचित्य साधून दिनांक ८ ते १२ एप्रिलदरम्यान प. पू. आत्मा मालिक माऊली यांच्या प्रमुख अधिष्ठानाखाली व सर्व संतमांदियाळीच्या सानिध्यात चैत्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात भजन, सत्संग, प्रवचन, विविध गुणदर्शन, भव्य दिंडी व मौनध्यान इ. प. पू. माऊलींच्या सानिध्यात अनुभवण्यास मिळणार आहे. यानिमित्ताने आत्मा मालिक ध्यानपीठाच्या वतीने सर्व भाविक भक्तांना विनंती करण्यात येते की या सुवर्णयोगाचा सर्वांनी लाभ घ्यावा व स्व-जीवनाचा महोत्सव करावा, हीच संतपीठाच्या वतीने आत्माभिलाषा! पुनश्च एकदा सर्वांना तीन दिवशीय चैत्र महोत्सवाचे सस्नेह निमंत्रण!

**आत्मा मालिक!**

**-संत परमानंद महाराज,**
संपादक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## सगुण : संकल्पना व उपासना (भाग १)

सद्‌गुरू साक्षात परब्रह्म म्हणजे 'सगुण असोनि निर्गुण' असतात. देवदर्शन घडते म्हणजे नेमके काय होते ते समजावून देण्यासाठी व देवाचे स्वरूप अनुभवास आणून देण्यासाठी देवाने गुरूशिष्यपरंपरा सुरू करून अखंड ठेवली आहे. सद्‌गुरू म्हणजे गुरूदेव हे अभेद भक्तिचा मार्ग सांगत असतात. शिष्यांची देहबुद्धी त्यांच्या त्यांच्या अधिकारपरत्वें क्रमशः वा तात्काळ कमी करून त्यांना ते 'आपल्यासारिखे' म्हणजे ब्रह्मस्वरूप करतात.

**- डॉ. विजय बाणकर**

ऋषी, मुनी आणि संत यांनी केली व ते करतात तशी सगुणोपासना करता यावी म्हणून त्यांना अभिप्रेत असलेली सगुण-संकल्पना म्हणजे पर्यायाने देवाची सगुण रूपे समजून घेणे आवश्यक ठरते. अध्यात्मवाङ्‌मयात व संतसाहित्यात त्याबाबत मार्गदर्शक वर्णने व उल्लेख आढळतात. त्यांचा चिकित्सक विचार करताना, देव धारण करतो ती त्याची सगुण रूपे, तो निर्मितो त्या सजीव सगुण मूर्ती आणि आपण मानव आपापल्या कल्पनेप्रमाणे मातीपासून, दगडांपासून वा विविध धातूंपासून तयार करतो त्या निर्जीव वा जड पण आकार असलेल्या मूर्ती यांपैकी, कोणत्या मूर्ती सगुण आहेत, ते सुस्पष्ट होते. परिणामी, बहुतेक लोक ज्याला सगुण म्हणतात त्याविषयीचे अज्ञान व वा गैरसमज दूर होतात.

या लेखाचे दोन भाग केले असून पहिल्या भागात सगुण-संकल्पना तर दुसऱ्या भागात सगुण-उपासनेचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

सगुण-संकल्पना

देवाधिदेवाची अवतार, संत, सद्‌गुरू, निर्गुणातील सगुण मूर्ती, मानवदेह आणि मानवकृत मूर्ती ही सहा सगुण व/वा साकार रूपे असल्याचे मानले जाते. ती क्रमशः समजून घेऊयात.

**१. अवतार :**

देवाधिदेव हा सगुण व निर्गुण या दोन्हीच्या पलीकडचा आहे व त्याचे सगुणनिर्गुणातीत असे ते मूळ स्वरूपच आम्हा संतांच्या अभंग 'ध्यानात' असते, असे संत श्रीकबीर म्हणतात.[१] सगुण म्हणजे गुणसहित म्हणून सापेक्षतेने निर्गुण या शब्दाचा गुणरहित असा अर्थ केला जातो. परंतु परमेशर निर्गुण आहे, असे म्हणताना तो गुणरहित आहे, असे संतांना सर्वदा अभिप्रेत नसते. तो निर्गुण आहे म्हणजे त्याचे ठिकाणी 'बहुगुण' आहेत, असे उदाहरणार्थ समर्थ श्रीरामदासस्वामी यांनी 'निर्गुण म्हणिजे बहुगुण' असे म्हणत स्पष्ट करून ठेवले आहे. 'निर्गुण म्हणिजे बहुगुण' या आपल्या विधानाचा सकलार्थ अध्यात्मग्रंथश्रवण केले तर उमगू लागतो, अशी मार्गदर्शक पुष्टीही त्यांनी आपल्या या म्हणण्याला दिली आहे.[२]

बहुगुणयुक्त वा अनंतगुणयुक्त म्हणजे सर्व गुणांचे परिपूर्ण रूप (परफेक्शन) असलेला देवाधिदेव अवतरतो म्हणजे काय ते, अल्पगुणयुक्त म्हणजे अल्प ज्ञान व अल्प शक्ती असलेल्या माणसांना, संत श्रीएकनाथ महाराज यांनी समजावून दिले आहे. ते म्हणतात की, सगुण होऊन तो निर्गुणाचे गुण प्रकट करतो.[३] तो आपली सदैव अच्युत (कधीही न बदलणारी) स्वरूपस्थिती जणू तात्पुरती सोडून मानवांची,

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

प्राण्यांची, वस्तुंची वा स्वतःची (पूर्वीही धारण केलेली) रूपे क्षणार्धात धारण करतो आणि आपण सर्वशक्तिमान व सर्वज्ञानी असल्याचे दाखवून देत असतो. उदाहरणार्थ, त्याचा आठवा अवतार असलेल्या भगवान श्रीकृष्णाने करंगळीवर गोवर्धन उचलून धरला होता, वणवा गिळला होता, कालियामर्दन केले होते, रासक्रीडा करताना स्वतःची व गोपिकांची अनेक 'स्व'रूपे धारण केली होती वगैरे आणि, शेवटी अर्जुनाला व उद्धवाला आपल्या सर्वव्यापक व सर्वातीत मूळ स्वरूपाचे दर्शनयुक्त (स्वानुभवयुक्त) ज्ञानही तो देऊन गेला होता. अशा अचाट कृती फक्त देवावतारच करू शकतात. तशा कृती करणे कुणाही सामान्य मानवांना शक्य नसते.

ब्रह्मीभूत श्रीसाखरेमहाराज व संत श्रीज्ञानेश्वरमहाराज यांनी अवतार व सामान्य मानव यांच्यातील पुढील भेद सांगितले आहेत[४] -

१) अवतार : शरीर हे केवळ देवाच्या संकल्पातून उत्पन्न झालेले असते; ते स्वगत व भेदशून्य असते. म्हणजे अवतार हा आपल्या शरीराच्या प्रत्येक अवयवाद्वारे पाहू, ऐकू, बोलू, वास घेऊ व विचार करू शकतो. म्हणून त्याच्या शरीराचे अवयव हे त्याच्या मूळ स्वरूपाहून वेगळे नसतात. अवतार-शरीर हे निरवयव असते. याउलट, सामान्य मानवांचे शरीर हे पंचभूतांपासून बनलेले, सावयव व भेदयुक्त असते. उदा. जे काम त्याचे डोळे करू शकतात ते त्याचे कान करू शकत नाहीत. म्हणून सामान्य मानवांचे शरीर भेदयुक्त असते. अवतार-शरीर मानवांच्या शरीराप्रमाणे दिसत असते पण ते तसे नसते. हे सत्य, उदाहरणार्थ श्रीकृष्णाच्या शरीरास दोरीने बांधता आले नव्हते तेव्हा त्याच्या यशोदामातेच्या प्रत्ययास आले होते.

२) अवतार त्रिगुणातीत वा शुद्धसत्त्वगुणी असतात तर मानव सगुण म्हणजे सत्त्व, रज व तम या तीन गुणांनी युक्त असतात.

३) अवतार सर्वज्ञ वा ज्ञानस्वरूप असतात, त्यांच्या ठिकाणी देहात्मबुद्धी नसते; याउलट, सामान्य मानव अल्पज्ञ वा अज्ञानयुक्त असल्याने 'नाशिवंत स्थूल देह म्हणजेच मी', असे समजत असतात.

४) अवतार सच्चिदानंद असतो तर मानवशरीर असत्, अनित्य व दुःखद असते. दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, मुख, गुद व लिंग ही नऊ द्वारे असलेले सामान्य मानवशरीर हे रक्त, वीर्य, दुर्गंधी, जंतू, विष्ठा, मूत्र यांनी भरलेले व त्रिविध तापांनी पोळत असते. म्हणून उदाहरणार्थ संत श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात तशी कान्होबाची म्हणजे भगवान श्रीकृष्णाची शरीररूपी घोंगडी 'चांगली' तर आपल्यासारख्या मानवांची शरीररूपी घोंगडी 'वांगली' असते.

५) निर्गुण असलेल्या देवाच्या ठिकाणी त्याच्याच इच्छाशक्तिमुळे गुणविकार निर्माण होऊन तो लक्ष्मी, यश, कीर्ती, औदार्य, वैराग्य व ज्ञान या षड्गुणांनी युक्त म्हणजे षड्गुणेश्वर झालेला व होत असतो.[५] त्यामुळे तो पूर्णतः स्वतंत्र वा कर्मातीत असतो. याउलट, मानवदेहांना जन्मणे, काही काळ असणे, वाढणे, तरुण होणे, वृद्ध होणे व मरणे हे विकार असतात[६] व त्यांच्यामागे काम, क्रोध, लोभ, मद, मोह व मत्सर हे वैरी (विकार) लागलेले असतात म्हणून मानवदेह कर्माधीन वा परतंत्र असतात.

**२. संत :**

अविभक्त भक्त म्हणजे संत हे देवाचे सगुण व सचेतन रूप असते असे,

**'देवासी अवतार भक्ताशी संसार।**

**दोहींचा विचार एकपणें।।१।।**

**एका अंगीं दोन्ही झाली हे निर्माण।**

**देवभक्तपण स्वामिसेवा।।४।।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

तुका म्हणे येथे नाही भिन्नभाव।
भक्त तोचि देव देव भक्त॥५॥',

या अभंगातून संत श्रीतुकाराम महाराज यांनी उद्घोषित करून ठेवले आहे. परमेशराच्या अवतारांप्रमाणे संतही स्वधर्माची साचार शिकवण देण्यासाठी जन्म घेत असतात, असे उदाहरणार्थ श्रीएकनाथ व श्रीसेनामहाराज या संतांनी उल्लेखिले आहे. [७] संताच्या विभूती म्हणजे अद्वय भक्तिचे मूर्तिमंत आदर्श असतात. ते सुखदु:खरूप कर्मफलांचा अभंग साक्षीभावाने अनुभव घेत असतात. सामान्य माणसांना त्यांचे जीवन आपल्यासारखे सुखदु:खयुक्त दिसत असते. पण, त्यामुळेच संतांप्रमाणे आपल्यालाही देवदर्शन घडेल अशी आशा त्यांना वाटत राहते. संतांची सहजस्थिती लोकांना नामस्मरणाची आठवण देत राहते. आपल्या तत्त्वदाती वाणीने संत भगवद्गुणवर्णन व नीतिघोष करत असतात. त्यांना आत्मारूपी परमशुभलाभ झालेला असतो म्हणूनच ते शांत, क्षमाशील, अहं मोह ममतारहित, काम-क्रोधविरहित, मानामान आशा नसलेले, परस्त्री-परधन-अभिलाषविवर्जित म्हणजे शुचिर्भूत असतात. ते 'सर्वांभूतीं आत्मिक समता' अनुभवत असतात म्हणून ते सदैव निंदा स्पर्धा द्वेषाद्वेषरहित असतात. त्यांच्या सहवासात लोकांच्या अंत:करणात परमार्थ दृढ होतो. संत म्हणजे लोककल्याणाचा देवकृत साक्षात उपायच असतात. संतांच्या 'सहपरिवारीं पापी व दुराचारी'देखील तरून जातात. म्हणूनच संत हे 'कलीचे दोष हरण करणारे हरीचे अंश' असतात[८] व 'धर्मस्थापनेचे नर। ते ईशराचे अवतार। झाले आहेत, पुढे होणार। देणे ईशराचे॥', असे अनुक्रमे संत श्रीनिळोबा व समर्थ श्रीरामदासस्वामी म्हणतात.[९]

**३. सद्गुरू :**

सद्गुरू साक्षात परब्रह्म म्हणजे 'सगुण असोनि निर्गुण' असतात. देवदर्शन घडते म्हणजे नेमके काय होते ते समजावून देण्यासाठी व देवाचे स्वरूप अनुभवास आणून देण्यासाठी देवाने गुरूशिष्यपरंपरा सुरू करून अखंड ठेवली आहे.[१०] सद्गुरू म्हणजे गुरूदेव हे अभेद भक्तिचा मार्ग सांगत असतात. शिष्यांची देहबुद्धी त्यांच्या त्यांच्या अधिकारपरत्वें क्रमश: वा तात्काळ कमी करून त्यांना ते 'आपल्यासारिखे' म्हणजे ब्रह्मस्वरूप करतात. शिष्यांना संत ही सर्वश्रेष्ठ व सर्वोत्तम पदवी बहाल करण्याचे सामर्थ्य सद्गुरूंच्या ठायी असते. म्हणूनच 'गुरू हा संतकुलीचा राजा' असतो, असे संत श्रीज्ञानदेव यांनी म्हटले आहे.[११]

**४. निर्गुणातील सगुण मूर्ती :**

परमेशराच्या आदि-अंत-रहित निर्गुण-निराकार अशा परमरूपाचा उल्लेख आत्मा, परमात्मा, ब्रह्म, परब्रह्म इत्यादि शब्दांनी केला जातो. आत्मज्ञानाने जीव मुक्त होतो. म्हणून आत्मरूप हेच परमज्ञेय व परमध्येय होय. ते भक्तिद्वारे गाठता येते. लोकांना आपली भक्ती करता यावी म्हणून परमेशरानेच हरि व हर ही आपली दोन सगुण-साकार रूपे निर्माण करून ठेवली आहेत.[१२] देवाची ही रूपे चर्मदृष्टीला दिसत नाहीत म्हणून ती निर्गुण, निराकार होत; पण, ज्ञानेशरीच्या अकराव्या अध्यायात उल्लेखिले आहे त्याप्रमाणे अर्जुनाला दिसली होती तशी श्रीसद्गुरूकृपेमुळे दिव्यज्ञानदृष्टी लाभलेल्या भक्त-साधकांना दिसतात म्हणून ती साकार व सगुण होत. उदाहरणार्थ संत श्रीजनाबाई या पाणी आणावयास जात तेव्हा केवळ त्यांनाच व त्यांच्यासारखी ज्ञानदृष्टी असलेल्या भक्तांनाही दिसू शकणारा देव त्यांच्यापाठीमागे त्यांना मदत करावयास धावत असे, पाणी आणून त्यांच्या रांजणात भरीत असे, त्यांचे धुणे धुवून आणीत असे, सडासारवण करीत असे, असे त्यांनी आपल्या अभंगातून देवाच्या त्या सगुण रूपाचे व कार्याचे वर्णन करून ठेवले आहे.[१३] संत श्रीनामदेवांना रोज भेटणारा देव त्यांच्या वडिलांनाही दिसला होता; इतर लोकांना मात्र तो

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

दिसला नव्हता, दिसत नव्हता. स्वतः देवाने श्रीनामदेवांचा हात श्रीज्ञानदेवांच्या हातात देऊन त्यांना तीर्थाटनास पाठविले व नंतर देव निजधामास गेले, असे संत श्रीनामदेवांनी लिहून ठेवले आहे.[१४] संत श्रीज्ञानदेव जेव्हा समाधी घेण्यास चालले होते तेव्हाही देव तिथे सगुण रूपात अवतरला होता व त्याठिकाणी असलेल्या संतांना म्हणजे दिव्यज्ञानदृष्टी असलेल्या भक्तांनाच तो दिसत होता.[१५] अर्थात, सत्त्वगुणमूर्ती हरि व तमोगुणमूर्ती हर ही निर्गुण-निराकार देवाची दोन सगुण-साकार रूपे होत व ते दोघेही खऱ्या भक्तांची कार्ये करण्यासाठी वा भक्तांनी बोलावल्यावर त्यांना दर्शन देण्यासाठी वेळोवेळी प्रगट होत असतात.

**५. मानवदेह :**

जीव म्हणजे परमेशराचा एक अंश होय, असे स्वतः देवानेच म्हटले आहे.[१६] अर्थात देवाचा अंश असलेला जीव देह, इंद्रिये व गुण यांमुळे सगुण झालेला असतो. म्हणून सजीव मानवदेखील देवाच्या सगुण मूर्ती होत. समर्थ श्रीरामदास स्वामी म्हणतात तशी ज्यामध्ये जीवेशर म्हणजे परमेशर राहतो ती 'चालती बोलती देउळे' म्हणजे सर्व मानवदेहदेखील होय.[१७]

**६. मानवकृत मूर्ती :**

महाभक्त प्रल्हाद हे विष्णू होऊन विष्णुची पूजा करीत असत आणि नंतर अज्ञानी लोकही सन्मार्गाला लागावेत म्हणून सोऽहंभावाने षोडशोपचारें मूर्तिपूजाही करीत असत.[१८] मूर्तिपूजा सुरू होण्यामागील हे मूळ प्रयोजन होय. ते विसरले जाऊन मूर्तिपूजा हीच जणू सगुण-पूजा आहे, असे लोकमत झाले आहे. म्हणून, सद्गुरू श्रीहंबीरबाबा यांनी समजावून सांगितले आहे, की मानवनिर्मित मूर्तींना स-गुण म्हणणे हे सयुक्तिक ठरत नाही. कारण, ते म्हणतात, की मूर्ती अचेतन, निर्जीव वा जड असते; तिला आकार असतो पण तिच्यात गुण नसतात. म्हणजे, उदाहरणार्थ, मूर्तीला डोळे असतात पण त्यांत 'पाहणे' हा डोळ्यांचा गुण(धर्म) नसतो; कान असतात पण ते ऐकू शकत नाहीत वगैरे.[१९] देवाधिदेव निर्गुण असून त्याने (तुम्हां)आम्हांला डोळे कान वगैरे ज्ञानेंद्रिये (व त्यांचे गुण) देऊन सगुण केले आहे, असे सगुण म्हणजे काय ते जणू समजावून देणारे विधान संत श्रीतुकाराम यांनीही करून ठेवले आहे.[२०] त्यांच्या या विधानावरूनदेखील, संत व मानवादि या सर्व देवकृत सजीव व सगुण मूर्ती होत, हे सद्गुरू श्रीहंबीरबाबाकृत विधान पटू लागते.

* * * * *

**संदर्भ व टिपा -**

१. सर्गुण की सेवा करौ, निर्गुण का करूं ध्यान। निर्गुण सर्गुण के परै, तहै हमारा ध्यान।। (भावानुवाद : सेवा करितां सगुणाची नि निर्गुणाचे ध्यान। निर्गुणसगुणातीताकडे अभंग आमुचे ध्यान।।

२. समर्थ श्रीरामदासस्वामी म्हणतात, 'परमेशराचे अनंत गुण। मनुष्यें काय सांगावी खूण। परंतु अध्यात्मग्रंथश्रवण। होतां उमजे।।' व 'निर्गुण म्हणिजे बहुगुण। बहुगुणी अंतरात्मा जाण। सकळ त्याचे अंश हे प्रमाण। प्रचीत पाहा।।' - दासबोध, अनुक्रमे १८.४.४० व १६.९.४;

३. श्रीएकनाथी भागवत, ४.२८७;

४. (अ) स्वगतभेद सावयव पदार्थात असतो. उदाहरणार्थ, झाडाच्या पानाफुलात एक झाड दुसऱ्या झाडाहून वेगळे असते. त्यातील भेदाला सजातीय भेद म्हणतात. झाड आणि दगड या भिन्न पदार्थातील भेदाला विजातीय भेद म्हणतात. अवतार-शरिरात हे भेद नसतात. (पाहा विचारसागररहस्य, पृष्ठे क्र. २८-२९); (ब) 'ऐसा परमात्मा परमानंद सजातीयविजातीयस्वगतभेद। नसोनिया वस्तु शुद्ध। जाण प्रसिद्ध निजबोधें।। विजातीय भेद 'मी देह' म्हणणे। सजातीय भेद 'मी जीवपणें। स्वगत भेद 'मी ब्रह्म' स्फुरणे। हे तिन्ही नेणे

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

परमात्मा।।' - श्रीएकनाथी भागवत, २८.५२५ ते ५२६ ; (क) श्रीज्ञानेशर, अभंग : कान्होबा तुझी घोंगडी चांगली । .... ;

५. (अ) समर्थ श्रीरामदासस्वामी म्हणतात, 'निर्गुणीं षड्विकार। तोचि षड्गुणेशर। अर्धनारीनटेशर। तयासि म्हणिजे।। आदिशक्ति शिवशक्ति। मुळीं आहे सर्वशक्ति। तेथून पुढे नाना व्यक्ति। निर्माण झाल्या।। तेथून पुढे शुद्ध सत्त्व। रजतमाचे गूढत्व। तयासि म्हणिजे महत्तत्त्व। गुणक्षोभिणी।।'- दासबोध, १७.२.८-१०); (ब) श्रीबहिणाबाई, अभंग : षड्गुणैशर्यें थोर तू जालासी ...... ;

६. देह जन्मतो, काही काळ असतो, वाढतो, तरुण होतो, वृद्ध होतो आणि मरतो हे षड्विकार होत. (हे जायते, अस्ति, वर्धते, विपरिणमते, अपक्षीयते, विनश्यति या सहा संस्कृत शब्दांचे भाषांतर होय.)

७. (अ) श्रीएकनाथ म्हणतात, 'धर्माची वाट मोडे। अधर्माची शीग चढे। तैं आम्हां येणे घडे। संसारस्थिती।। आम्हां का संसारां येणें। हरिभक्ति नामस्मरणें। जडजीव उद्धरणें। नामस्मरणें करूनी।।' व 'संतांच्या विभूती। धर्मालागी अवतरताती।।'; (ब) संत श्रीसेनामहाराज म्हणतात, 'असतां वैकुंठासी। काय सांगे ऋषिकेशी। जाऊनि मृत्युलोकासी। जन भक्तिसी लावी कां।।';

८. संत श्रीनिळोबा, अभंग क्र. १३४४ व १३६६ ;

९. दासबोध, १८.६.२० ;

१०. एक शिष्य एक गुरु। हा रूढला साच व्यवहारू। तो मत्प्राप्तिप्रकारू। जाणावया।।-(ज्ञानेशरी, १८.१२२६) ;

११. श्रीज्ञानदेव अभंग : गुरु हा संतकुलीचा राजा । गुरु हा प्राणविसावा माझा। गुरुविण देव दुजा। पाहता नाही त्रिलोकीं।।१।। ;

१२. (अ) श्रीतुकाराम, अभंग : रूप नांव माया बोलावया ... ; (ब) एवं सकळांमध्ये थोर। तो एकचि परमेशर। तयामध्ये हरिहर। होती जाती।। - दासबोध, ६.४.२० ;

१३. अभंग : जनी जाय पाणीयासी ;

१४. अभंग : 'हासोनी पंढरीनाथ पाहे..' व 'तीर्थयात्रेप्रति बोळविला..' ;

१५. पाहा श्रीनामदेवकृत श्रीज्ञानेशर-चरित्रपर अभंग ;

१६. गीता, १५.७ ;

१७. दासबोध, १७.१.१४ ;

१८. पहा 'श्रीयोगवासिष्ठ', उपशम प्रकरण, सर्ग ३१, पृष्ठे क्र. ६८८-६९० ;

१९. जीवनकलेची साधना, आवृत्ती क्र.१०, पृष्ठे क्र. ६६-६७ ;

२०. श्रीतुकाराम, अभंग : (देवाला उद्देशून ते म्हणतात,) 'तुम्ही बैसलेती निर्गुणाचे खोळे। आम्हांसी कां डोळे कान दिले ।।१।।

**- डॉ. विजय बाणकर,**

बी -११०९, ग्रासलँड हाऊसिंग सोसायटी,
मु. कोल्हेवाडी, पो. खडकवासला (आर.एस.),
पुणे - ४११०२४, (९३२५५८८०९५)

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## ज्ञानेश्वरीचे सहज स्मरण : भाग २

आपल्या दैनंदिन जीवनात विविध घटना घडत असतात. लग्न समारंभ, वाढदिवस, सण, सुखदुःखाच्या सर्व प्रसंगांत आपल्याला ज्ञानेश्वरीतील ओव्यांचे स्मरण होणे हा सहजयोग चिंतन-मननानेच शक्य होतो. आजच्या काळातील वास्तववादी घटना पाहत असताना सुमारे आठशे वर्षांपूर्वी ज्ञानराजांनी लिहून ठेवलेल्या ओव्या आठवतात आणि त्या त्या प्रसंगाला तंतोतंत जुळतात. प्रसंग अगदी सामान्य असतात.

**-नामदेव सदावर्ते**

**आ**पले गीतेचे ज्ञान समजून सांगण्यासाठी ज्ञानराजांनी दिलेल्या दृष्टांताच्या ओव्या मनाला स्पर्श करून जातात. स्मरणात आलेल्या ओव्या प्रकट करणेही शक्य नसते.

प्रसंग खूप सामान्य असतो. एक लहान बाळ रांगता रांगता जमिनीवर पडलेला काटेचमचा हाती घेऊन तोंडात घालते. दुरून त्या बाळाची आई हे पाहून घाईघाईने बाळाच्या तोंडातून चमचा काढते व रागाने म्हणते, याला काहीही दिसो, मग ते स्वच्छ असो, घाणेरडे असो. दिसेल ते हातात घेतो आणि तोंडात घालतो. ज्ञानराजही म्हणतात-

**हें चोरव हें मैरव । ऐसे नेणोनिया बाळ ।**
**देखें ते केवळ। मुखीचि घाली ।।**

एखादी अपायकारक वस्तू बाळाने तोंडात घातली तर त्याला अपाय होण्यापूर्वी बाळाची आई येते. कारण आईचे आपल्या बाळाकडे लक्ष असते. अन्य कामे करीत असूनही आईचे बाळाकडे प्रेमळ लक्ष असते. आपल्या लाडक्या तान्हुल्यावर आपल्या प्रेमाच्या दृष्टीचे प्रेमळ पांघरुण घालून आपल्या बाळाच्या मागे ते खेळत असतानासुद्धा माऊली धावते व बाळास सांभाळते.

**लळेचियां बाळका किरीटीं । गवसणी करूनि स्नेहाचिया दिठीं ।**
**जैसी खेळता पाठोपाठी । माऊली धावें ।।**

आईची जशी बाळावर मायेची पाखर असते. तसे ते बाळही आईला क्षणभरही दृष्टीआड होऊ देत नाही. क्षणभर जरी आई दिसली नाही तर बाळ कासावीस होते. त्या बाळाभोवती इतर अनेक स्त्रिया असतात. त्या बाळाचे रडणे थांबविण्यासाठी खूप प्रयत्न करतात. पण बाळ रडणे थांबवित नाही. यावेळेला इतर नातेवाईकही असतात. रंगी-बेरंगी खेळण्या, खाऊ देण्याचा प्रयत्न करतात. कोणत्याही वस्तूंकडे ढुंकूनही न पाहता बाळ रडतच असते. रडणाऱ्या बाळाच्या आईपेक्षा अधिक सुंदर दिसणाऱ्या महिला तेथे असताना बाळ आपल्या आईसाठी रडत असते. आईकडून मिळणाऱ्या प्रेमासाठी बाळ रडत असते. तिथे असलेल्या सुंदर सुंदर स्त्रियांइतकी बाळाची आई सुंदर नसते. पण बाळाची ती प्रेमळ आई असते. ज्ञानराज म्हणतात-

**आणि आपुली माय । कुब्ज जरी आहे ।**
**तरी जीजे ते नोहे । स्नेह कुऱ्हे की ।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**येरी जिया पराविया । रंभेहूनि बरविया ।**

**तिया काय करविया । बाळकें तेणें ।।**

आपली आई कुरूप, कुबडी जरी असली तरी तिचे प्रेम कुरूप नसते. इतर अनेक स्त्रिया रंभेहूनही सुंदर असतील. त्यांचा त्या प्रेमाच्या भुकेलेल्या बालकाला काय उपयोग? आई ती आई!

जे लहान बाळ मोठ्या प्रयत्नाने कसे तरी आईचे दूध पिते, त्या बाळाला कोणी पक्वान्ने वाढली तर चालणार नाही. ज्ञानराज सांगतात-

**जें सायासें स्तन्य सेवी । तें पक्वान्नें केवी जेवीं ।**

**म्हणोनि बाळकाजैसी नेदावीं । धनुर्धरा।।**

बाळ थोडे मोठे झाल्यावर चालू लागल्यावर मोलकरीण बाळाला जेवू घालायला बसते. तेव्हा पहिल्याच घासामुळे बाळाला ठसका लागतो व ते रडू लागते. बालक सहजपणे खाऊ शकेल असे लहान घास आईच करून बाळाला खाऊ घालते. बाळ का रडते ते आईलाच कळते.

**बाळकातें ओरसे । माय जै जेववूं बैसे ।**

**तैं तया ठाकती तैसे । घास करी ।।**

**आपुली तहानभूक नेणे।**

**तान्ह्या निके ते माऊलीसीचि करणे ।**

आपले मूल अधिक सुंदर दिसावे म्हणून बाळाच्या कानात बाळ्या, हातात वाळे, गळ्यात सोन्याची माळ, पायात साखळ्या, तोडे घालण्याची पूर्वी पद्धत होती. ते दागिने बाळाला टोचत असत. पण आई-वडिलांच्या हौसेचा तो सोपस्कार बाळ सहन करीत असावे. बाळाला त्या दागिन्यांचे महत्त्व, भूषण नव्हते, ते आईच्या आनंदासाठी होते. ज्ञानराज म्हणतात-

**अगा बाळका लेवविजे लेणे । तया श्रृंगारा बाळ काय जाणे ।**

**तो सोहळा भोगणे । जननीयेसी दृष्टी ।।**

बाळाच्या बारशाच्या प्रसंगी पिंटू, चिंटूसारखे टोपण नावही ठेवले जाते. बाळ जन्माला येते तेव्हा त्याला नाव नसते. आपणच ठेवलेल्या नावाला बाळ ओ देते. ज्ञानराज सांगतात -

**उपजलिया बाळकासी । नाव नाही तयापासी ।**

**ठेविलेया नावासी । ओ देत उठी ।।**

लहान बालके बोबडे बोलताना नेहमी आढळतात. ते त्यांचे बोबडे बोल ऐकल्यावर ज्ञानेश्वरीतील ओवी आठवते. मातापित्यांना बाळाचे बोबडे बोलही आठवतात.

**जैसा स्वभावो मायबापांचा । अपत्य बोले जरी बोबडी वाचा ।**

**तरी अधिकचि तयाचा । संतोष आथी ।।**

आपल्या बाळाचे बोबडे बोल जसे आईबापाला आनंद देतात, तसेच बाळाचे धडपडत उभे राहणे, हळूहळू अडखळत चालणे आईस आनंद देते. ज्ञानराज म्हणतात-

**नातरी बालक बोबडा बोली। कां वाकुडा विचुका पाऊली ।**

**ते चोज करूनि माउली । रिझे जेवीं ।।**

आई आपल्या बाळाला स्वतःचे दूध पाजण्यासाठी वेळेचे बंधन घालत नाही. बाळाला जेव्हा भूक लागेल तेव्हा ते कधीही रडू लागते. त्या त्या वेळी आई त्यास दूध पाजते. ज्ञानराज म्हणतात-

**जैसे मातेच्या ठायीं । अपतया अनवसरू नाही ।**

**स्तन्यालागुनि पाही । जयापरी ।।**

एकदा गाई-म्हशी असलेल्या मळ्यात गेल्यावर अनेक गाई तेथे बसलेल्या असतात. काही अंतरावरून एक वासरू पळत येते. ते पाहून एक गाय ताडकन उठते. वासरू गाईजवळ येताच ते दूध पिण्यास सुरुवात करते. हे पाहून ज्ञानेश्वरीतील एक ओवी आठवली.

**अहो वासरूं देखिलियाचि साठी । धेनु खडबडोनि मोहे उठीं ।**

**मग स्नमुखाचिया भेटी । काय पान्हा न ये ।।**

दूध पिता पिता वासरू गाईच्या कासेला ढुसण्या देते. त्याचा गाईला त्रास होतो. पण त्यामुळे गाईला अधिक पान्हा फुटतो.

**अहो, तान्ह्याचे लागता झटे। तेणे अधिकचि पान्हा फुटे ।**

**रोषे प्रेमे दुणावटे । पढियंतयाचेनि ।।**

गाईचे वासरू मेल्यावर त्या वासराचे तोंड लावलेला भुसा भरलेले पोते गाईला दाखवून नंतर तिचे दूध काढले जाते. ज्ञानेश्वरीत एक ओवी आहे.

**पै वासरूवाचा भोकसा । गाईपुढे ठेवूनि जैसा ।**

**उगाणा घेती क्षीररसा । बुद्धिवंत ।।**

गाईने दूध द्यावे म्हणून केली जाणारी ही थोडी फसवणूकच, पण तो व्यवहाराचा भाग आहे. गाय शेतकऱ्याला व सर्वांनाच मातेसमान असते. गाय चिखलात, गाळात किंवा कुठेही अडकून पडली असेल तर तिला सहानुभूतीपूर्वक मदत करून तिचा जीव वाचविला जातो. मग ती गाय दूध देणारी आहे की भाकड आहे हे न पाहता दयाळू लोक गायीस मदत करून तिचा जीव वाचवितात. ज्ञानराज म्हणतत-

**कां चिखली रूतली गाये । धड भाकड न पाहे ।**

**तियेचिया ग्लानी होये । काला भुला ।।**

कोणी मनुष्य पाण्यात बुडत असला तर तो कोणत्या धर्माचा आहे, कोणत्या जातीचा आहे हे न पाहता त्याचा प्राण वाचविण्यासाठी त्याला प्रथम पाण्यातून बाहेर काढले जाते. ज्ञानेश्वरीत ओवी आहे-

**नाना बुडतयाते सकरूणु । न पुसे अंत्यजु की ब्राह्मणु ।**

**काढुनि राखे प्राणु । हेचि जाणे ।।**

स्त्रियांवरील अत्याचाराच्या अनेक बातम्या आपण नेहमी वृत्तपत्रात वाचतो. मनाला दुःख देणाऱ्या अशा वार्ता वाचल्यावर ज्ञानेश्वरीतील एक ओवी आठवते-


**महावनी पापियें । उघडी केली विपायें ।**

**ते नेसविल्याविण न पाहें । शिष्टु जैसा ।।**

सुमारे आठशे वर्षांपूर्वीसुद्धा दुष्ट, पापी वृत्तीच्या लोकांकडून अशा अत्याचाराच्या घटना घडत होत्या. दुष्ट प्रवृत्ती अनादि कालापासून आहेत. फक्त तेव्हा आणि आजही दुष्टांचे प्रमाण जास्त व शिष्टांचे प्रमाण कमी असते, हे दुर्दैव!

शहरातही कॉलनीच्या वस्तीत तीन रस्त्याच्या मध्यावर बळी ठेवलेला असतो. घरातील कुणाची तरी ग्रहशांती वा वास्तुशांतीनिमित्त आजही ब्राह्मणाने सांगितल्याप्रमाणे चार रस्त्यावर असा बळी ठेवतात. हा भरदुपारी किवा सायंकाळी ठेवतात. असा बळी ठेवलेला नैवेद्य कुठे दिसला की, मनात ज्ञानेश्वरीची ओवी आठवते.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



**जैसी चोहटाचिये बळी । पाविजे सैरा काऊळी ।**
**तैसी महापापे कुळी । प्रवेशती ।।**

कधी रस्त्याने जाताना गारूड्याचा खेळ चालू असलेला दिसतो. गारूडी अनेक सर्प, नाग प्रेक्षकांना दाखवित असतो. नागपंचमीच्या दिवशी तर नागपूजा केली जाते. पोटासाठी कसरतीचे विविध खेळ, जादूचे, हातचलाखीचे खेळ दाखवून प्रेक्षकांची करमणूक केली जाते. गारूडी सर्पाचा खेळ दाखविल्यावर प्रेक्षकाकडे थाळी फिरवून भीक मागतो. पोटासाठी गारूडी साप पाळतो. ज्ञानराज म्हणतात-

**पाही भिकेपरतें न लाहे । तऱ्ही गारूडी सापू वाहे ।**
**काय कीजे शीणुचि होये । गोडु एका ।।**

काही सर्प विषारी असतात. युद्धप्रसंगी अर्जुनाला मोहरुपी सर्पाने दंश केला. अर्जुनाच्या शरीरभर विष पसरत चालले. पण भगवान श्रीकृष्ण हा असा गारूडी आहे, की त्याच्या केवळ नजरेने विष उतरते.

**हे जाणोनि ऐसी प्रौढी । जो दृष्टीसवे विष फेडी ।**
**तो धावयां श्रीहरी गारूडी । पातला की।।**

नाग, साप जसे गारूड्याजवळ असतात, तसे अनेक नाग, साप जंगलात फिरत असतात. अनेक लहानमोठे प्राणी जंगलात असतात. जंगलात एक साप तोंड आ वासून आहे. तो एक बेडूक क्षणात तोंडात पकडून गिळणार आहे. पण

बेडकाला हे माहीत नाही. बेडूक आपली जीभ लांब करून माशा पकडून खाण्यात मग्न झालेला आहे. आपल्यालाही साप असे गिळू शकतो, हा विचार तो करीत नाही.

**बेडूक सापाचिया तोंडी । जातसे सबुडबुडी ।**
**तो मक्षिकांचियां कोडी । स्मरेना काही ।।**

जंगलातील प्रसंग आपण प्रत्यक्ष पाहू शकत नाही, पण नाग व त्याचा फणा पाहिल्यावर ज्ञानेश्वरीतील आणखी एक ओवी आठवते.

**हे असो आघवी बोली । सांग पां सर्पफणी साउली ।**
**ती शीतल होईल केतुली । मुषकासी ।।**

उन्हाळ्यात एक उंदिर छान गार गार सावलीत बसला आहे. पण ती सावली सर्पाच्या फणाची आहे. किती वेळ ती सावली उंदराला थंड वाटेल?

आजही खेड्यापाड्यात आणि शहरातील लोकवस्तीच्या भागात बहुरुपी रायरंग आढळतात. निरनिराळ्या वेशभूषेत फिरून ते लोकांचे मनोरंजन करून धान्य, कपडे, पैसे गोळा करून उदरनिर्वाह करतात. पोशाखानुसार त्यांचे बोलणेही गमतीदार असल्याने सर्वांचे मनोरंजन होते. पोलिस, फौजदार,

राजाराणी, हनुमान आदी वेशभूषेत हे बहुरुपी जनतेचे मनोरंजन करीत फिरतात. बहुरुपी पाहिल्यावर ओवी आठवते-

**जैसी बहुरुपियाची रावो राणी। स्त्री पुरुष भावों नाही मनी ।**
**परी लोकसंपादनी । तैशीच करिती ।।**

बहुरुपी लोक जेव्हा राजाराणीचे सोंग आणतात, त्यावेळी त्यांच्या मनात स्त्री-पुरुष, राजाराणी असा भाव नसतो. लोकांच्या मनोरंजनासाठी ते तसेच करतात.

जिथे फसवणूक होणार आहे, तेथे रक्कम दुप्पट होण्याच्या आशेने किंवा जास्त व्याजाच्या आशेने आपले हजारो रुपये गुंतविणाऱ्याकडे, एखाद्या हरिनामसप्ताहासाठी वर्गणीची मागणी केली तर एक कवडीसुद्धा देत नाही. अशा प्रसंगी ज्ञानेश्वरीची एक ओवी आठवते.

**पै दृष्टादृष्टीचिये जोडी । लागी भांडवल न सुटे कवडी ।**
**जेथ सर्वस्व हानि तेथ कोडी । वेचिती गा ।।**

तसेच लोभी वृत्तीची माणसे एक रुपया जास्त मिळावा म्हणून शंभर रुपये दुसऱ्यांच्या हाती देतात. यावेळी ज्ञानराजांची ओवी स्मरते.

**एकोत्तरेयाचिया वाढी । जे जळतिये आगी घालिती उडी ।**
**ते अनायासे स्वगोडी । सांडिती केविं ।।**

आपण एसटीतून किंवा चारचाकी गाडीतून प्रवास करीत असताना स्वतःच्या पायांनी आपण एक पाऊलही चालत नाही. पण तरीही आपण शेकडो मैल पार करून जातो. हा विचार मनी येताच ज्ञानदेवांची ओवी आठवते.

**देखें रथी आरूढिजे । मग जरी निश्चळा बैसिजे ।**
**तरी चळा होऊनि हिंडीजे । परतंत्रा ।।**

तसेच याच अर्थाची आणखी एक ओवी आठवते. त्यात ज्ञानदेव म्हणतात-

**तरी बांधोनि हात पाये । जो रथी घातला होये ।**
**तो न चले तरी जाये । दिगंता जेवी ।।**

अत्यंत लहान प्रसंगांतून ज्ञानेश्वरीच्या ओवीचे सहज स्मरण करून देणाऱ्या संत ज्ञानदेवांना वंदन !

**-नामदेव सदावर्ते,**
मानकर मळा, मखमलाबाद, नाशिक

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



निरुपण

## संतांचे संगतीं प्रेमाचा कल्लोळ।

त्रिदेव ब्रह्मांड, ब्रह्मांडातील जीव यांचा विचार करताना त्या जीवात्म्यातील बुद्धीची सांगड त्यांच्या कृतीशी घालून करीत असतात. पण त्यांच्या मूळात म्हणजे त्यांच्या अंतरंगात मूळ आत्मा हा दडलाय व तो अनादी आहे, हे विसरून जातात. तो अनादी आत्मा हा विठ्ठल रूपात आहे. विठ्ठल म्हणजे गुणरहित निराकार परमात्मा म्हणजेच ब्रह्म होय. ब्रह्म हा कार्याच्या वेळेला त्रिदेव असतो व इतर वेळेला ब्रह्मरूपाने द्रष्टा होऊन राहातो.

-बंडोपंत कुलकर्णी

अकार उकार मकार करिती हा विचार।
परि विठ्ठलु अपरंपार न कळे रया।।
संतांचे संगतीं प्रेमाचा कल्लोळ।
आनंदें गोपाळ माजी खेळे।।
भाळे भाळे भक्त गाताती साबडे।
त्यांचें प्रेम आवडे विठोबासी।।
बापरखुमादेविवरु परब्रह्मपुतळा।
तेथील हे कळा निवृत्ति जाणे।।

संतानी अभंग लिहित असताना त्यांना झालेल्या ईश्वर दर्शनाचा लाभ सर्वांना करून देण्यासाठी आपली अनुभूती व त्यापासून आलेले अनुभव हे शब्दांत मांडण्याचा प्रयत्न अभंगरूपाने केला. प्रथम भाषा तयार झाली व नंतर व्याकरण, हे सर्वश्रुत आहे. जेव्हा साहित्यनिर्मिती सुरू झाली ती प्रथम काव्यापासून झाली. सर्व वेद व पुराणे काव्यरूपात आहेत. संस्कृत मूळ भाषा व त्या भाषेला मूलतः गेयता आहे. म्हणजे व्याकरणाचे नियम गद्यापेक्षा पद्य लिहिताना काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे. असो. मूळ संदर्भाकडे येऊ.

ओंकार हे ईश्वराचे बीज व निज नाम आहे. आकार, उकार व मकार यांच्या संयोगाने ॐ कार तयार झाला. ॐकार प्रधान। रूप गणेशाचे।। असे तुकाराम महाराज सांगतात.

अकार तो ब्रह्मा, उकार तो विष्णू।
मकार महेश्वर जाणीयेगा।।
ऐसे तिन्ही देव जेथूनी उत्पन्न।
तो हा गजानन मायबाप।।

यातून श्री गणेश हा त्रिदेवांच्या पूर्वी होता व तोच मायबाप आहे, असे तुकोबाराय सांगतात. ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या आरंभीच म्हणतात-

ॐनमो जी आद्या। वेद प्रतिपाद्या।
जय जय स्वसंवेद्या। आत्मरूपा।।
देवा तूंचि गणेशु। सकलार्थमतिप्रकाशु।
म्हणे निवृत्तिदासु। अवधारिजो जी।।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

यातून माऊलीही सर्वप्रथम गणेशच आहे व तो आत्मरूपात आहे, हेच सांगत आहे. म्हणजे सर्वप्रथम इथे आत्माच आहे. म्हणून आत्मा हाच ब्रह्मांडाचा मालक आहे. ब्रह्माचे दुसरे नाव आत्मा आहे. तो स्वतःला स्वतःच निर्माण करतो म्हणून तो जय जय स्वंसवेद्या आहे व सर्वांच्या मतीत ज्ञान प्रकाश निर्माण करतो. पण तो निर्गुण निराकार स्वरूपात आहे.

ब्रह्मा, विष्णू आणि महेश हे त्याच्यापासून निर्माण झाले आहेत व त्यांनी रज, सत्, तम असे गुण धारण केलेले आहेत. याचा अर्थ त्यांच्याकडे धारण केलेल्या गुणाशिवाय अन्य गुण नाही, असे नाही. ते जेव्हा स्थिर होतात, तेव्हा सर्व गुण धारण करतात. जेव्हा कार्यासाठी गुण धारण केले तेव्हा त्या कार्यात धारण केलेल्या गुणांचा उपयोग करतात. आकार, उकार आणि मकार, यात कार हा शब्द समान आहे. कार याचा अर्थ कर्तव्य, धर्मकार्य वा धर्मपर कर्म करणे, असा आहे. कारसेवा हा शब्द सर्वांना माहीत आहेच. ब्रह्मांनी त्रिदेवांना कार्यासाठी निर्माण केले म्हणून प्रत्येकाच्या समोर कार शब्द आला आहे. कार्य करायचे म्हंटले की नुसते कार्य नसते. जसे एखादे चित्र काढायचे झाल्यास चित्र कोणते काढावे, यावर विचार, चित्र निश्चित केल्यावर ते चित्र प्रथम मनात निर्माण होणार, बुद्धीच्या सहाय्याने आत्मसात करून चित्तात नेणार व चित्त व कृती यांच्या संयोगात प्रत्यक्ष योजलेले कार्य पार पडणार. तसे या त्रिदेवांना ब्रह्मांड नियंत्रण कार्य करण्यासाठी विचार करणे व विचारांती फलित प्रमाणे कार्य करणे, हे त्यांचे धर्म पर कर्म आहे. म्हणून माऊली म्हणते अकार उकार मकार करिती हा विचार।

त्रिदेव ब्रह्मांड, ब्रह्मांडातील जीव यांचा विचार करताना त्या जीवात्म्यातील बुद्धीची सांगड त्यांच्या कृतीशी घालून करीत असतात. पण त्यांच्या मूळात म्हणजे त्यांच्या अंतरंगात मूळ आत्मा हा दडलाय व तो अनादी आहे, हे विसरून जातात. तो अनादी आत्मा हा विठ्ठल रूपात आहे. विठ्ठल म्हणजे गुणरहित निराकार परमात्मा म्हणजेच ब्रह्म होय. ब्रह्म हा कार्याच्या वेळेला त्रिदेव असतो व इतर वेळेला ब्रह्मरूपाने द्रष्टा होऊन रहातो. म्हणून माऊली म्हणते परि विठ्ठल अपरंपार न कळे रया।।

सत्संगात रज व तम हे गुण गळून पडतात. रज निर्माणकारी तर तम हा विनाशकारी आहे. निर्माण करण्यापूर्वी निर्मितीचे काही शिल्लक नसते व निर्मितीचा नाश केल्यावरही काही शिल्लक नसते. पण सत् हे निरंतर आहे. कारण सत् ची ओढ असल्याने निर्माण व सत्ची ओढ असल्यानेच पुर्ननिर्माणाकरिता विनाशाकडे धाव असते. जेव्हा सत् गवसते तेव्हा या देहातील सर्व जगत् संपुष्टात येते व जगताचा नाश होतो. तेव्हा निर्माण व विनाश याचा संदर्भही कुठेच शिल्लक राहात नाही. हे सर्व आकाराशी संबंधित आहेत. आकार असे रूपालाही म्हंटले जाते. पण रूप न घेता निर्मितीसाठी कार्य करण्याला आकार म्हणावे. कार शिवाय निर्माण व निर्मिती होत नाही. म्हणून या देहाला रूप असले तरी हा देह कार्यासाठीच आहे. म्हणून तो आकार आहे. जेव्हा आकार संपुष्टात येतो म्हणजे रज, तम गळून पडतात व तेव्हा फक्त आणि फक्त सत् उरतो. जर आपणाला एखादी वस्तू हवी असेल तेव्हा ती मिळाल्यावर भूत व भविष्य संपुष्टात येऊन आपण त्या प्राप्त वस्तूशी एकरूप होऊन त्या वस्तूरूप होतो. वस्तूचे महात्म्य संपले की आपण त्यापासून विलगतो. पण परमात्म्याचे महात्म्य हे न संपणारे आहे. एकदा परमात्मा मिळाला की त्याच्यापासून कदापि विलग होणे नाही. शिवाय आपल्या प्राप्तीच्या ओढीसाठी निर्माण होणे वा विनाश होणे नाही. देहभाव संपतो. याचा प्रत्यय माऊलीच्या संजीवन समाधीत दिसून येईल. याच कारणे माऊली परमात्म्याशी एकरूप झाली. अपेक्षेत वा प्राप्तीच्या ओढीत षड्रिपू आहेत. षड्रिपू संपुष्टात येता फक्त प्रेम उरते. प्रेम हे षड्रिपूंपैकी नाही. जेव्हा सर्व संपुष्टात येते तेव्हा फक्त प्रेम शिल्लक राहाते. परमात्मा व आत्मा यांचे एकरूप होणे, म्हणजे प्रेम होय. पर म्हणजे परका व अम म्हणजे स्वतः. परक्याच्या ठिकाणी स्वतःला पाहणे म्हणजे त्याच्याशी अद्वैत साधणे म्हणजे प्रेम होय. यालाच आपण अद्वैत म्हणतो. जेव्हा संताची संगत मिळते तेव्हा षड्रिपू गळून

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

पडतात व तिथे फक्त प्रेम शिल्लक राहते. म्हणून माऊली म्हणते संताचे संगतीं प्रेमाचा कल्लोळ।

गो म्हणजे देहातील इंद्रिय होय. आनंद ही चित्ताची परमोच्च अवस्था आहे. आनंद हाच ईश्वर आहे. दृष्टान्त ध्यायचा म्हणजे जसे राजा नंद हे श्रीकृष्णाचे जन्मदाते नव्हते पण त्याच्या प्राप्तीने ते स्वतःला विसरून गेले. म्हणजे राजा नंद यांची सर्व इंद्रिये कार्यरत असूनही अकर्मिक भाव निर्माण केला. म्हणजेच इंद्रिये श्रीकृष्णाच्या स्वाधीन झाली. संत मीराबाईने श्रीकृष्णाला सर्वस्व अर्पण करून निवांत राहिली. आपल्या प्रत्येक संतांनी तेच केले.

**आवडीने भावे हरिनाम घेसी।**
**तुझी चिंता त्यासी सर्व आहे।।**
**नको खेद करू कोणत्या गोष्टीचा।**
**पती लक्ष्मीचा जाणतसे।।**

असे संतांनी त्या कारणे म्हंटले. अकर्म म्हणजे केलेल्या कार्यात स्वतःला न पाहणे व श्रेय ईश्वराला देणे. चित्त हा आत्म्याचा सवंगडी आहे. नंदाच्या इंद्रियांप्रमाणे आपली सर्व इंद्रिये ही ईश्वर वा श्रीकृष्णाच्या अधीन होऊन त्याच्यातच रमून जातात. हे सर्व घडते ते फक्त संतसंगतीत वा सत्संगाने. नंद श्रीकृष्णाच्या स्वाधीन व इंद्रियांचे संगोपन करणारा गोपाळ श्रीकृष्ण हा नंदाच्या स्वाधीन, असे त्यांचे वास्तव्य व त्यात दोघांनी तितक्याच तन्मयतेने रमणे. आनंदे गोपाळ माजी खेळे।। असे माऊली त्या कारणे म्हणते.

संगीतात ईश्वराचे अधिष्ठान आहे. म्हणून साहित्य प्रथमतः काव्य वा गेय स्वरूपात आले. शिवाय भगवद्गीता भगवान श्रीकृष्णाने काव्य प्रकारात सांगितली. भोळे भाबडे भक्त ईश्वराला आपल्या ओबडधोबड वाणीने गाऊन आळवित असतात, तेव्हा ईश्वर हा आपल्या भक्ताच्या वाणीतील वा गाण्यातील भोळेपणा व ओबडधोबडपणा सोडून त्यातील त्यास आवडणारे गेय स्वीकारतो. कारण गीत, गाणे व संगीत हे प्रेमचे प्रतीक नव्हे तर प्रत्यक्ष प्रेम आहे. प्रेमात षड्रिपू नाहीत व प्रेम निखळ, नीरव व निर्मळ असते. म्हणून ते स्थिर आहे. ब्रह्म स्थिर व गीतातील वा आळवणीतील भाव स्थिर, यातून तो विठ्ठल ब्रह्मभक्ताच्या भक्तिशी समरसतेत स्वतःच्या स्थिर स्वरूपाला पाहून आनंदून जातो. म्हणून माऊली म्हणते

**भाळे भाळे भक्त गाताती साबडे।**
**त्यांचें प्रेम आवडे विठोबासी।।**

परब्रह्म पुतळा व कळा, हे परस्पर विरोधी भाव दाखवितात. परब्रह्म पुतळा हा बापरखुमादेविवरू श्री विठ्ठल म्हणजे स्थिर परमात्मा होय. पण तो परब्रह्म हा त्रिदेवाच्या सहाय्याने ब्रह्मांड नियंत्रण व पालन करतो. त्याच्या या कलेची अनुभूती निवृत्तीनाथांना आली. त्यांनी जे जे अनुभवले त्याचे दर्शन त्यांनी ज्ञानदेवांना करून दिले. म्हणून माऊली आपल्या साधनेचे सर्व श्रेय आपले गुरू निवृत्तीनाथांना देतात. तसे श्रेय गुरूदेवांनाच द्यायला पाहिजे.

**श्रीगुरुसारिखा असता पाठीराखा।**
**इतरांचा लेखा कोण करी।।**

**- बंडोपंत दि. कुलकर्णी**
जिल्हा न्यायाधीश, पुणे

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## 'ज्ञानेश्वरी'तील आत्मादर्शक सौंदर्यस्थळे- भाग : ३

# आत्मबोधें तोषला, तरी कृतकार्यु देखें जाहला!

आत्म्याचे मोल आणि असाधारण संवेदनशीलत्व कथन करताना 'ज्ञानेशरी' च्या तिसऱ्या अध्यायात व्रत-नियम, शारीर पीडा अनावश्यक असल्याचे माउली ज्ञानदेव समजावतात. आत्म्याचा स्वधर्म ते अनमोल मानतात. उपवास तापास, व्रत-नियम, शरीर पीडन, तीर्थ यात्रांची आटाआटी हे अनावश्यक. आत्मा जाणावा हे उत्तम. आत्म्याचा स्वधर्म सर्वोत्तम. हा स्वधर्म जाणल्यास भगवंत योगक्षेम चालवणार यांत शंकाच नको.

-डॉ. सुनील शिंदे

**आ**त्म्याचे मोल आणि असाधारण संवेदनशीलत्व कथन करताना 'ज्ञानेशरी' च्या तिसऱ्या अध्यायात व्रतनियम, शारीर पीडा अनावश्यक असल्याचे माउली ज्ञानदेव समजावतात. आत्म्याचा स्वधर्म ते अनमोल मानतात. उपवास तापास, व्रत-नियम, शरीर पीडन, तीर्थ यात्रांची आटाआटी हे अनावश्यक. आत्मा जाणावा हे उत्तम. आत्म्याचा स्वधर्म सर्वोत्तम. हा स्वधर्म जाणल्यास भगवंत योगक्षेम चालवणार यांत शंकाच नको. यासंदर्भात माउलींचा खणखणीत दाखला पुढीलप्रमाणे-

तुम्हीं व्रतें नियमु न करावे। शरीरातें न पीडावें।
दुरी केंही न वचावे। तीर्थासी गा।।८९।।
योगादिक साधनें। साकांक्ष आराधनें।
मंत्रयंत्रविधानें। झणीं करा।।९०।।
देवतांतरा न भजावें। हें सर्वथा कांहीं न करावे।
तुम्हीं स्वधर्मयज्ञीं यजावें। अनायासें।।९१।।
अहेतुकें चित्तें। अनुष्ठां पां ययातें।
पतिव्रता पतीतें। जियापरी।।९२।।
तैसा स्वधर्मरूप मखु। हाचि सेव्य तुम्हां एकु।
ऐसें सत्यलोकनायकु। म्हणता जहाला।।९३।।
देखा स्वधर्मातें भजाल। तरी कामधेनु हा होईल।
मग प्रजाहो न संडील। तुमतें सदा।।९४।।
देवान् भावयतानेन ते देवाः भावयंतु वः।
परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यच।।११।।
जें येणेचिकरूनि समस्तां। परितोषु होईल देवतां।
मग ते तुम्हां ईप्सीता। अर्थांते देती।।९५।।
या स्वधर्मपूजा पूजितां। देवतागणां समस्तां।
योगक्षेमु निश्चिता। करिती तुमचा।।९६।।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

आयुष्यातील इप्सित समजून घेणे आवश्यक आहे. देह कर्म वेगळे अन् आत्मबोध अलग हे समजून घेणे आवश्यक ठरेल. स्वकर्म निष्कामता ज्याला उमगली आणि ज्याने अनुसरली त्यास कैवल्य दूर नव्हे. यासंदर्भात माउलींची भूमिका तर्कशुद्ध मांडणीतून साकारते. आत्मबोध तो अनमोल. कसा? माउली म्हणतात-

**देखें असतेनि देहकर्में। एथ तोचि एकु न लिंपे कर्में।**
**जो अखंडित रमे। आपणपांचि।।१४६।।**
**जे तो आत्मबोधें तोषला। तरी कृतकार्यु देखें जाहला।**
**म्हणोनि सहजे सांडवला। कर्मसंगु।।१४७।।**
**नैव तस्य कृतेनार्थो माकृतेनेह कश्चन।**
**न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः।।१८।।**
**तृप्ती झालिया जैसीं। साधने सरती आपैसीं।**
**देखें आत्मतुष्टीं तैसीं। कर्मे नाही।।१४८।।**
**जंववरी अर्जुना। तो बोध भेटेना मना।**
**तंवचि यया साधना। भजावे लागे।।१४९।।**
**तस्मादसक्तः सततं कार्य कर्म समाचर।**
**असक्तो ह्याचरन् कर्म पमाप्नोति पुरूषः।।१९।।**
**म्हणऊनि तूं नियतु। सकळ कामरहितु।**
**होऊनियां उचितु। स्वधर्मे रहाटें।।१५०।।**
**जे स्वकर्मे निष्कामता। अनुसरले पार्था।**
**कैवल्य पर तत्वतां। पातले जगी।।१५१।।**

आत्मस्थिती समजावणारे संतश्रेष्ठ ज्ञानदेव लौकिक वास्तवदेखील विचारात घेताना दिसतात. मार्गाधारे आचरण प्रतिपादन करतात ज्ञानेशर महाराज. विश मोहरे लावावे अशी भावना ते व्यक्त करतात. लौकिक-अलौकिकाचा भेद ते प्रकट करतात.

**आम्ही पूर्णकाम होऊनी। जरी आत्मस्थिती राहुनी।।**
**तरी हे प्रजा कैसेनि। निस्तरेल।।१६६।।**
**इहीं आमुची वास पाहावी। मग वर्तती परी जाणावी।**
**ते लौकिक स्थिती अवघी। नासिली होईल।।१६७।।**
**म्हणोनि समर्थु जो एथें। आथिला सर्वज्ञते।**
**तेणे सविशेषें कर्मातें। त्यजावे ना।।१६८।।**
**सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत**
**कुर्याद्विवांस्तथाऽसक्तश्चिकीर्षुर्लोकलोग्रहम्।।२५।।**
**देखे फळाचिया आशा। आचरे कामुकु जैसा।**
**कर्मी बहरु होआवा तैसा। निराशाही।।१६९।।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**जे पुढतपुढती पार्था। हे सकळ लोकसंस्था।**
**रक्षणीय सर्वथा। म्हणऊनियां।।१७०।।**
**मार्गाधारे वर्तावें। विश हें मोहरें लावावें।**
**अलौकिक नोहावें। लोकांप्रति।।१७१।।**

हृदय कमळाराम हाच तो योगियांचे सर्वस्व असा विस्तार माउली करतात. विकारांवर स्वतंत्र भाष्य करताना दिसतात. आत्मा नि:संशय श्रेष्ठ हे ओघाने आलेच. याबाबतीत माउलींचे विश्लेषण पुढीलप्रमाणे-

**तंव हृदयकमळारामु। जो योगियांचा निष्कामकामु।**
**तो म्हणतसे पुरुषोत्तमु। सांगेन आइक।।२३९।।**
**तरी हे काम क्रोधु पाहीं। जयांते कृपेची साठवण नाहीं।**
**हें कृतांताचां ठायीं। मानिजती।।२४०।।**

एकूणच आत्मारुपी स्थिर स्थित जाणीव, प्रगल्भ सुस्पष्ट भूमिका तसेच आत्मीय देवाचे अस्तित्व याबाबतीतले संत ज्ञानदेवांचे विवेचक भाष्य साधार आहे.

**- डॉ. सुनील शिंदे**
'दत्त सुकृत', 'व्हेलेन्सिया रेसेडेन्सी',
बी-विंग, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती सहकारी साखर कारखाना रोड,
अकोले, जि. अहमदनगर
(मो. ९४२३०४५३४२/९०७५९९४३३२)

***



## चैत्र गुढीपाडवा व श्रीराम नवमी जन्मोत्सव

**चैत्र मासारंभ शुद्ध प्रतिपदा गुढीपाडवा साडेतीन मुहूर्तातील पहिला मुहूर्त चैत्र पाडवा सर्वत्र आनंदाची गुढी उभारून उत्साहांत साजरा करण्यात येतो. सौर वर्ष शालीवाहन शके १९४७ प्रारंभ होते. सर्वत्र नव चैतन्याचा अविष्कार दिसून येतो. गुढीपाडवा चैत्र शुद्ध प्रतिपदा ते नवमी चैत्र नवरात्री तिथी शु. नवमीला राम नवमी श्रीराम जन्मोत्सव पूर्ण भारतात अत्यंत उत्साहात साजरा होतो.**

**- बी. के. गायकवाड**

**चै**त्र मासारंभ शुद्ध प्रतिपदा गुढीपाडवा साडेतीन मुहूर्तातील पहिला मुहूर्त चैत्र पाडवा सर्वत्र आनंदाची गुढी उभारून उत्साहांत साजरा करण्यात येतो. सौर वर्ष शालीवाहन शके १९४७ प्रारंभ होते. नुकतेच वसंत ऋतू आगमन झालेले असते. वृक्षांस नवीन पालवी आलेली, कडूलिंब मोहरलेला, आम्रवृक्षास बहुतांश ठिकाणी मोहर येऊन कैऱ्या लगडलेल्या दिसतात. शेतातील रब्बी हंगामातील पिकाची काढणी होऊन सुगीची कामे, उरकली असल्याने गाव-गावातील यात्रा मोठ्या उत्साहात करण्यात येतात. सर्वत्र नव चैतन्याचा अविष्कार दिसून येतो. गुढीपाडवा चैत्र शुद्ध प्रतिपदा ते नवमी चैत्र नवरात्री तिथी शु. नवमीला राम नवमी श्रीराम जन्मोत्सव पूर्ण भारतात अत्यंत उत्साहात साजरा होतो. श्रीराम चरित्र विस्तृत आहे. जाणून घेऊ या थोडेसे श्रीराम अवतार कार्याबाबत-

परमात्मा भगवान श्रीविष्णूचा सगुण साकार अवतार 'श्रीराम' साधारण दहा हजार वर्षांपूर्वी अयोध्या नगरीचे राजा दशरथ व सौ कौशल्या देवी राणी यांचे पुत्र म्हणून जन्म अवतार झाला. राणी सुमित्राचे लक्ष्मण व शत्रुघ्न व राणी कैकेयीचा भरत ही रामाची भावंडे. बालपणी श्रीगुरू वशिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली गुरुकुलात विद्यार्जन, धनुर्विद्या पारंगत झाले. कुशाग्र बुद्धीचे, मधुर भाषी, श्रीराम सर्वांचे प्रिय होते.

महान ऋषी विशामित्र यांचे विनंतीनुसार व वशिष्ठ ऋषींच्या संमतीने राजा दशरथाने श्रीराम-लक्ष्मणास त्यांच्याबरोबर आश्रमात यज्ञाच्या रक्षणासाठी पाठविले. ऋषी विशामित्रांनी श्रीरामास अनेक शस्त्र-अस्त्रांचे विद्या ज्ञान दिले. ते श्रीरामांनी अंगीकारले व यज्ञाचे यशस्वी पूर्ततेनंतर श्री विशामित्र ऋषी श्रीराम-लक्ष्मणास बरोबर घेऊन राजा श्री जनक यांचे मिथिला नगरीस निघाले.

प्रवासात एका निर्जन स्थळी आश्रमात श्रीरामांनी गौतम ऋषींची पत्नी अहिल्यादेवीला शापमुक्त करून उद्धार केला व अहिल्या-गौतम ऋषींची भेट झाली.

मिथिला नगरीत आल्यानंतर जनक राजाने ऋषी विशामित्र व श्रीराम-लक्ष्मणाचे आदराने प्रेमपूर्वक स्वागत केले. राम-लक्ष्मणाची ओळख करून देऊन विश्रामित्रांनी आपल्या येण्याचे प्रयोजन सांगितले. राजा जनकाने त्यांच्याकडील प्रचंड शिवधनुष्य आणून आपली प्रिय कन्या सीता स्वयंवराबाबत सांगितले. श्रीरामांनी धनुष्याला प्रत्यंचा चढवून स्वयंवर जिंकला. श्रीराम-सीता विवाहासाठी राजा दशरथास बोलवण्यात आले. गुरु वशिष्ठ यांच्या मार्गदर्शनाखाली व गौतम ऋषींचे पुत्र शतानंद यांच्या पौरोहित्यात श्रीराम व सीता तसेच राजा जनक यांच्या बंधूंच्या कन्यांसोबत अन्य तिन्ही भावंडांचा विवाह पारंपरिक रीतीने मोठ्या थाटात पार पडला.

राजा दशरथ आपल्या मुला-सुनांसह अयोध्येस परतले. संपूर्ण अयोध्यानगरी सडा-मार्जन, रांगोळ्या, तोरणांनी सजली होती. काही काळ गेला. राजा दशरथाने आपले आता वय झाले असल्याचे

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

सांगून दरबारातील आपले सर्व मंत्र्यांच्या अनुमतीने व गुरु वशिष्टांच्या संमतीने श्रीरामास राज्य गादी देण्याचा निर्णय घेतला.

तथापि, राणी कैकेयी हिने दशरथाकडून पूर्वी प्राप्त वराचे साकडे राजाला घालून श्रीरामास १४ वर्षे वनवास आणि पुत्र भरताला राज्य मागून घेतले.

श्रीराम पितृआज्ञेनुसार सीता व बंधू लक्ष्मणासह वनवासी गेले. पुत्रशोकाने राजा दशरथ स्वर्गवासी झाले. यासमयी भरत आजोळी गेला होता. भरत आल्यावर सर्व वृत्त कळाले. भरताने राज्याचा स्वीकार न करता श्रीरामास वनवासातून परत अयोध्यास आणण्यासाठी गेला. भेटीत पिता दशरथ गेल्याचे वृत्त सांगितले. शोकाकुल श्रीरामांनी नदी मंदाकिनीत पित्याची उत्तरक्रिया केली. भरताने श्रीरामास परत अयोध्यास येण्याची विनंती केली. तथापि, पितृ वचन पूर्तता हेच आपले कर्तव्य असल्याचे श्रीरामांनी सांगितले. भरत रामाकडून पादुका घेऊन परतला आणि पुढील १४ वर्षे त्या गादीवर ठेवून स्वतः व्रतस्थ राहून राज्य सांभाळले.

श्रीरामांनी वनवासाच्या काळात ऋषीमुनींच्या भेटीत मार्ग क्रमत असता चित्रकुट पर्वतानजीक महर्षी अत्री ऋषींच्या आश्रमात येऊन अत्री ऋषी व अनसूया मातेची भेट घेतली. त्यांचे शुभाशीर्वाद मिळाले. पुढे महर्षी शरभंगांना दर्शन देऊन त्यांना मुक्ती दिली. पुढील मार्गात सुतीक्ष्ण ऋषींची भेट झाली. त्या ठायी चित्रकूट पर्वत ते पंपा सरोवर हा दंडकारण्याचा दक्षिण पथ भाग हा तपोभूमी होता. तथापि तेथील उन्मत्त राक्षसांनी मानव समाजास मोठ्या प्रमाणात हानी करून अनेक तापसी जणांचा जीव घेतला. तापसांची ही दयनीय स्थिती पाहून श्रीरामांनी वनवासातील आपला जवळ जवळ १० वर्षांचा कालावधी तेथे राहून त्या दुष्ट राक्षसांचे पूर्ण निर्दालन केले. तेथील प्रदेश तापसांना भयमुक्त केला. ऋषी सुतीक्षणांचे आदरातिथ्य घेऊन पुढील वनवास आरंभीला. वनवासांत अनेक कष्ट होते. ते सीतादेवी श्रीराम लक्ष्मणाच्या सानिध्यात सहज शोषित होत्या.

श्रीराम-लक्ष्मण व सीता महर्षी अगस्ती यांच्या आश्रमी आले व त्यांचे दर्शन केले. अगस्ती ऋषींनी श्रीरामास बहुमूल्य भगवान विष्णूंचे वैष्णव महाधनुष्य व इतर आयुधे (शस्त्रे) देऊन पुढील कार्यास आशीर्वाद दिले.

श्रीराम, सीता व लक्ष्मण गोदावरी नदी किनारी पंचवटीत आले असता तेथील प्रदेशातील रावणाचा भाऊ खरनामक राक्षसाने सैनिकासह आक्रमण केल्याने त्याचा व त्याचे सर्व सैन्याचा रामाने वध केला. ही वार्ता खराची बहीण शूर्पणखा हिने लंकेचा राजा रावणास दिली.

रावणाने या ठिकाणावरून सीतेचे कपटाने अपहरण केले. त्यावेळी तेथील जटायु पक्षाने रावणास तीव्र प्रतिकार केला व आपला देह ठेवला. मरणाआधी श्रीरामास दुष्ट रावणाचे कृत्य सांगितले. रामाने लक्ष्मणासह सीतेचा शोध घेण्यास प्रारंभ केला. पंपा सरोवरानजीक आल्यावर मातंग ऋषींच्या आश्रमी शबरीची भेट झाली. त्यांना मुक्ती देऊन श्रीराम-लक्ष्मण किष्किंधा नगरीनजीक आले. तेथे प्रथमच हनुमंताची भेट झाली. वानरराज सुग्रीव भेटीत सुग्रीवाने आपला भाऊ वाली याच्या अधर्मी वागणुकी बाबत सांगितले. सुग्रीव आणि वाली युद्धात वालीचा वध करून सुग्रीवास अभय देऊन राज्य दिले. श्रीराम-सुग्रीवाने हनुमंताला व अंगदाला सीतेचा शोध घेण्यासाठी पाठवले. हनुमंत सागर पार करून लंकेत जाऊन सीतेचा शोध घेऊन परतले.

श्रीरामांनी, लक्ष्मण, राजा सुग्रीव, हनुमंत व वानरसेनेसह समुद्र पार करून लंकेत येऊन दुष्ट राक्षस अधर्मी राजा रावणाशी युद्ध करून त्याचे सर्व पुत्र, सेनानी व राक्षससेना यांचा निःपात केला. युद्धात रावणाचा वध झाला. रावणाचा बंधू बिभीषण श्रीरामास युद्धापूर्वी प्रथम शरण आला असल्याने त्यास युद्धानंतर लंकेचे राज्य दिले व सीतेची बंदिवासातून सुटका झाली.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

एव्हाना १४ वर्षांचा वनवास काळ पूर्ण झाला होता. श्रीराम-लक्ष्मण, सीता व सोबत राजा बिभीषण, वानरराज सुग्रीव, हनुमंत यांसह अयोध्यास परतले. भरत व सर्व मातांना फार आनंद झाला. भरताचे रामावरील बंधुप्रेम महान होते. सर्व अयोध्यानगरी सजवली, सर्वत्र गुढ्या-तोरणे उभारली, श्रीरामांनी भरताकडून राज्य स्वीकारले. भरताला युवराज्याभिषेक केला.

श्रीरामचंद्रांनी आपले आयुष्य संपूर्ण जनतेच्या कल्याणासाठी वेचले. दुष्टांचा संहार व सज्जनांचे रक्षण केले. एक पत्नी, एक बाणी व सत्य वचनी श्रीराम, हजारो वर्षे लोटली तरी श्रीराम आजही सर्वांच्या हृदयमंदिरी नामरूपाने नित्य स्मरणीय, वंदनीय आहेत. श्रीराम चरित्र कथा नित्य नूतन आहे. श्रीरामाचा आदर्श हा सर्व मानव समाजापुढे कायम वंदनीय आहे. अनेकांनी श्रीराम कथा लिहिल्या आहेत. महर्षी वाल्मिकींचे लिहिलेले 'संपूर्ण रामायण' आजही सर्वत्र मोठ्या श्रद्धेने आदराने वाचण्यात येते. रामकथा मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम व त्यांचा भक्त हनुमंत यांचा जन्मोत्सव या चैत्र महिन्यात सर्वत्र आनंदात साजरा होतो.

श्री विष्णू अवतार श्रीरामाचे महात्म्य सांगताना देवाधिदेव महादेव पार्वतीला सांगतात- देवी श्रीरामाचे एक नाव विष्णुसहस्त्र नामाबरोबरीचे आहे. मी स्वतः ध्यानातून माझ्या अंत:करणी नित्य श्रीरामाचा जप करीत असतो. श्रीराम सर्वांचे आराध्य दैवत आहे.

श्री हनुमंत हे पूर्ण रामचरणी लीन होते. लंकेतून सीतेचा शोध घेऊन आल्यावर रावणाबरोबर झालेल्या युद्धात हनुमंताने अतुलनीय कामगिरी केली. श्रीरामांच्या चरणी पूर्ण समर्पित भक्तीने प्रभू रामचंद्रांनी हनुमंताला चिरंजीव केले. चैत्र पौर्णिमेला 'श्री हनुमान जयंती' सर्वत्र साजरी होते.

श्री हनुमंतांना वंदन करताना म्हटले जाते -

**मनोजवं मारुततुल्यवेगं**
**जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठ।**
**वातात्मजं वानरयूथमुख्यं**
**श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।**

श्री संत समर्थ रामदास स्वामी (इ.स.१६०८ ते सन १६८१) यांची ही जयंती रामनवमी तिथीला होते. ते महान संत श्रीरामभक्त होते व ते श्री छत्रपती शिवरायांचे गुरू होते. त्यांनी श्रीरामाचा महिमा त्यांचे लिखित ग्रंथ साहित्य मनाचे श्लोक, मनोबोध यातून परिपूर्ण सांगितला आहे.

सर्व संतांनी श्रीरामाची एकमुखाने थोरवी गायली आहे. विशात्मक जंगली महाराज आश्रम कोकमठाण अंतर्गत आत्मा मालिक ध्यानपिठ यांचे नेरले, जि. सांगली या आश्रमांत दरवर्षी चैत्र नवमीला सर्व संतांचे उपस्थितीत श्री रामजन्म सोहळा सप्ताह मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. कोकमठाण येथील आश्रमातही सर्व संतांचे व प. पू. सद्गुरूंच्या उपस्थितीत चैत्र गुढीपाडवा, रामनवमी, हनुमान जयंती या उत्सवांसोबत चैत्र शुद्ध चतुर्दशीला (चौदस) चैत्र महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यात योग, संतांच्या उपस्थितीत अनुष्ठान पूर्तता, प. पू. सद्गुरुंसमवेत सत्संग व ध्यान व दर्शन होते. चैत्र महोत्सवासाठी आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण ध्यानयोग मिशनद्वारा सस्नेह निमंत्रित करण्यात आलेले आहे. जीव आत्मोन्नत व्हावा, जीवनांत शोशत सुख-समाधान व आनंद मिळावा, यासाठी सर्व भाविकांना चैत्र महोत्सव पर्वणी आहे. त्याचा लाभ सर्वांनी आवर्जून घ्यावा. आत्मा मालिक, जय आत्मदेव!

**- बी. के. गायकवाड**

प्लॉट क्र.५, नव महाराष्ट्र को. ऑप.
हौसिंग सोसायटी, सातारा रोड,
अरण्येशर कॉर्नर, पुणे - ४११००९
मो. नं. ९४०३०२६१६४

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## पुरुषार्थ

आज पूरी दुनिया में उथल-पुथल का दौर चल रहा है, ऐसी स्थितियों में अक्सर लोग लक्ष्य को पाने की आस छोड़ देते हैं। उनका सारा ध्यान महज अपने अस्तित्व को बचाए रखने में लग जाता है। लक्ष्य का होना जीवन को स्पष्टता देता है। अच्छी खबर यह है कि आप बंधी-बंधाई सुरक्षित राहों से अलग राह चुनते हैं तो उन अवसरों पर सोचना भी आसान हो जाता है, जो आपको मुश्किल लगते थे। पुरुषार्थ कभी व्यर्थ नहीं जाता, बल्कि सफलता का सूत्रधार है पुरुषार्थ।

**-नरेश यादव**

**पुरुषार्थ कहीं पर मोल नहीं, जो मूल्य चुका अपना सकते।**
**तेरे सासों की यह ताक़त , बस आत्म सुझाव से पा सकते।।**

सभी तरह के मानव जीवन में चाहे वह सांसारिक हो संत का हो, गुरुरूप हो, या फ़िर फक़ीरी भरा या अन्य कोई, कुछ ना कुछ इछाएँ बलवती रहतीं हीं, वह स्वयं, सामाजिक उत्थान, अथवा फिर जन कल्याण के लिए हो, पर जीवन में पलती ही हैं। कोई भी मानव जीवन इससे अछूता नहीं है, क्योंकि मानव अकार्मिक नहीं हो सकता और कर्म हो रहा तो प्रकृति उसका परिणाम उपजती ही है, यह नियम नहीं प्रक्रिया है। अतः हमारे किसी के मन में कोई इच्छा बलवती हो रही है, तो अपने जीवन की अवस्था अनुसार उस काम को करना चाहिए। यह हर युग में प्रत्येक पुरुषोत्तम ने किया है। श्री राम व कृष्ण से लेकर गुरु तेगबहादुर तक के सभी समय के पुरुषार्थ के उदाहरण हैं। दिव्य हिमाचल से साभार एक बहुत ही प्रेरक प्रसंग, आपको आनंदित कर देगा आपके समक्ष रख रहा हूँ। जब असंभव सी दिखाने वाली चीजों को पुरुषार्थ के बल पर देवों के प्रण को विफल कर मानव के पुरुषार्थ के सामने देवाधिदेव महादेव भी प्रेरित हो गए। वाक्य है पुरुषार्थ कभी व्यर्थ नहीं जाता, बल्कि सफलता का सूत्रधार है पुरुषार्थ। इसके लिए जरूरी है आप हर रोज अपने सपनों के बारे में सोचें और उनको आकार देने के लिए तत्पर हों।

आज पूरी दुनिया में उथल-पुथल का दौर चल रहा है, ऐसी स्थितियों में अक्सर लोग लक्ष्य को पाने की आस छोड़ देते हैं। उनका सारा ध्यान महज अपने अस्तित्व को बचाए रखने में लग जाता है। लक्ष्य का होना जीवन को स्पष्टता देता है। अच्छी खबर यह है कि आप बंधी-बंधाई सुरक्षित राहों से अलग राह चुनते हैं तो उन अवसरों पर सोचना भी आसान हो जाता है, जो आपको मुश्किल लगते थे। पुरुषार्थ कभी व्यर्थ नहीं जाता, बल्कि सफलता का सूत्रधार है पुरुषार्थ। इसके लिए जरूरी है आप हर रोज अपने सपनों के बारे में सोचें और उनको आकार देने के लिए तत्पर हों। इलियट के शब्दों में कहा है वह जीवन जिसे हमने जीने में ही खो दिया। फिर भी हमें उस जीवन को पाना है, जहां इनसान आज भी अपनी पूरी ताकत, अभेद्य जिजीविषा अथाह गरिमा और सतत पुरुषार्थ के साथ जिंदा है। इसी जिजीविषा एवं पुरुषार्थ के बल पर वह चांद और मंगल ग्रह की यात्राएं करता रहा है। उसने महाद्वीपों के बीच की दूरी को खत्म किया है। वह अपनी कामयाबियों का जश्न मना रहा है। फिर भी कहीं-न-कहीं इन्सान के पुरुषार्थ की दिशा दिग्भ्रमित रही है। मनुष्य के सामने हर समय अस्तित्व का संघर्ष कायम है। जब हम अपनी ही सोच और क्षमताओं पर संदेह करने लगते हैं, तब अंधेरा घना होता है। तभी लगता है कि अब कुछ नहीं हो सकता। लेखिका एलेक्जेंड्रा फ्रेंजन कहती हैं, अगर दिल धड़क रहा है, फेफड़े सांस ले रहे हैं, और आप जिंदा हैं तो कोई भी भला, रचनात्मक और खुशी देने वाला काम करने

में देरी नहीं हुई। हालांकि इस संघर्ष और विशास से उसको नई

ताकत, नया विशास और नई ऊर्जा मिलती है और इसी से संभवतः वह स्वार्थी बना तो परोपकारी भी बना। वह क्रूर बना तो दयालु भी बना, वह लोभी व लालची बना तो उदार व अपरिग्रह भी बना। वह हत्यारा और हिंसक हुआ तो रक्षक और जीवनदाता भी बना। आज उसकी चतुराई, उसकी बुद्धिमता, उसके श्रम और मनोबल पर चकित हो जाना पड़ता है। इस सबके बावजूद जरूरत है कि इन्सान का पुरुषार्थ उन दिशाओं में अग्रेसर हो, जहां से उत्पन्न सद्गुणों से इन्सान का मानवीय चेहरा दमकने लगे। इन्सान के सम्मुख खड़ी अशिक्षा, कुपोषण और अन्य जीने की सुविधाओं के अभाव की विभीषिका समाप्त हो। वह जीवन के उच्चतर मूल्यों की ओर अग्रसर हो। सत्य, अहिंसा, सादगी, सच्चाई और मनुष्यता के गुणों के बारे में उसकी आस्था कायम रहे। कहते हैं एक बार इंद्र किसी कारणवश पृथ्वीवासियों से नाराज हो गए और उन्होंने कहा कि बारह वर्ष तक वर्षा नहीं करनी है। किसी ने उनसे पूछा कि क्या सचमुच बारह वर्ष तक बरसात नहीं होगी। इंद्र ने कहा-हां, यदि कहीं शिवजी डमरू बजा दें तो वर्षा हो सकती है। इंद्र ने जाकर शिवजी से निवेदन किया कि भगवन आप बारह वर्ष तक डमरू न बजाएं। शिवजी ने डमरू बजाना बंद कर दिया। तीन वर्ष बीत गए, एक बूंद पानी नहीं गिरा। सर्वत्र हाहाकार मच गया। एक दिन शिव-पार्वती कहीं जा रहे थे। उन्होंने देखा कि एक किसान हल-बैल लिए खेत जोत रहा है। उन्हें बड़ा आश्चर्य हुआ। दोनों किसान के पास गए और कहने लगे क्यों भाई। जब आपको पता है कि आने वाले नौ वर्षों में भी बरसात नहीं होगी तो तुम खेत की जुताई क्यों कर रहे हो? किसान ने कहा वर्षा को होना न होना मेरे हाथ में नहीं है, लेकिन मैंने यदि हल चलाना छोड़ दिया तो बारह साल बाद न तो मुझे और न ही मेरे बैलों को हल चलाने का अभ्यास रहेगा। हल चलाने का अभ्यास बना रहे इसलिए हल चला रहा हूं। किसान की बात सुनकर पार्वती ने शिवजी से कहा कि स्वामी तीन साल हो गए आपने डमरू नहीं बजाया, अभी नौ साल और नहीं बजाना है। देखा, कहीं आप भी डमरू बजाने का अभ्यास न भूल जाएं। शिवजी ने सोचा-बात तो सही है। डमरू बजाकर देख लेना चाहिए। वह डमरू बजाकर देखने लगे। उनका डमरू बजते ही पानी झरझर बरसने लगा। मनुष्य को अपने भाग्य पर निर्भर न रहते हुए, अपनी मेहनत पर भरोसा करना चाहिए। भाग्य मेहनत से ही जुड़ा है।

यहाँ यह भी प्रेरणा मिलती है कि आलोचनाओं या आलोचकों से डरे नहीं, ये लोग हमारे लिए सुधार के अवसर लाते हैं। आलोचनाएं एक अवसर देती हैं, आत्म निरीक्षण का, रूपांतरण का। आप में एक अद्भुत परिवर्तन हो सकता है। इसलिए कोई आलोचना कर रहा है, आपके विषय में कोई निंदा कर रहा है, आपकी कोई कमियां गिना रहा है, आपके दुर्गुण बता रहा है तो ये आपके अपने हैं, जो आपको श्रेष्ठ बनाना चाहते हैं। आपके अपने ही आप में एक दिव्यता लाना चाहते हैं।

अतः परिस्थितीयाँ कैसी भी हों, सही की चाहत हमेशा रखकर, अपने कार्तव्य का अभ्यास करते रहना चाहिए। संतों की प्रेरणा कहती है की कुछ शब्द ऐसे हैं, जिन पर हम विचार करें तो जीवन बड़ा सहज हो जाता है। जैसे- ये सब संभव है, हम सब कर सकते हैं, हम जीत सकते हैं। जो कुछ दुर्लभ है, उसे प्राप्त किया जा सकता है। जीवन में कुछ भी दुर्लभ नहीं है, हर चीज सुलभ हो सकती है। कुछ भी असंभव नहीं है, सब संभव है। मनुष्य के पास वैसा सामर्थ्य है, जिससे वह असंभव को संभव कर सकता है। इसलिए चुनौतियों से डरना नहीं चाहिए, चुनौतियों में छिपे अवसरों को पहचानें और उनका लाभ उठाएं। यही सच्चा पुरुषार्थ है। आत्मा मालिक।


**निज रूप बसो आत्म बनकर, फिर जीवन धन्य तुम्हारा है।**
**पत्थर भी चटककर सांस भरे, कि सामने गुरु का प्यारा है।।**

**- नरेश यादव,**
आत्मा मालिक परिवार, इंदौर

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

॥ सबका मालिक आत्मा ॥



परमपूज्य सद्गुरु माऊलींच्या दिव्य सानिध्यात

# आत्मा मालिक चैत्र महोत्सव

## ८ एप्रिल ते १२ एप्रिल २०२५

### दैनंदिन कार्यक्रम रुपरेषा

| | |
|---|---|
| पहाटे ४.०० ते ६.०० | - श्रीपादुका अभिषेक , ध्यान व काकडआरती. |
| सकाळी ६ :०० ते ७:०० | - योग सत्र |
| सकाळी ७.०० ते ८.०० | - चहापान -नास्ता |
| सकाळी ९.०० ते ११.३० | - मौन ध्यान, भजन, प्रवचन, व मध्यान्ह आरती. |
| दुपारी १२.०० ते १.०० | - महाप्रसाद |
| दुपारी ४:०० ते ५:०० | - हरीपाठ |
| सायंकाळी ५:०० ते ६:०० | - मौन ध्यान व आरती |
| सांय. ७:०० ते ८.३० | - भजन, प्रवचन व संध्या आरती. |
| रात्री ८.३० ते ९.३० | - महाप्रसाद |
| रात्री ९.३० | - शेजारती |

**टीप -पहाटे ३ ते सकाळी ९ या वेळेत गुरुयाग विधी संप्पन्न होईल.**



आयोजक

## आत्मा मालिक ध्यान योग मिशन

आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण,
शिर्डी-कोपरगांव रोड, ता. कोपरगांव, जि.अ.नगर

* प्रेषक *

**संपादक, मासिक ॐ गुरुदेव**

**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,**

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगांव रोड,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)-४२३६०१

२७